# यशवंतनगरातील ड्रेनेज तुंबल्याची समस्या तातडीने निकाली

## मा. महापौर डॉ. वैशाली घोडेकर-लोंढे यांच्या पुढाकाराने जेटिंग मशीनद्वारे मुख्य ड्रेनेज लाइनची साफसफाई

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**यशवंतनगर परिसरातील मुख्य ड्रेनेज लाइन तुंबल्यामुळे नागरिकांना होणाऱ्या त्रासाची दखल घेत महापौर तथा प्रभाग क्रमांक ९ च्या नगरसेविका डॉ. वैशाली घोडेकर-लोंढे यांच्या पुढाकाराने तातडीने जेटिंग मशीनच्या सहाय्याने साफसफाईची कार्यवाही करण्यात आली.**



ड्रेनेज लाइनमध्ये साचलेला गाळ, कचरा व इतर अडथळे काढून संपूर्ण लाइनची सखोल स्वच्छता करण्यात आली. या कार्यवाहीमुळे सांडपाण्याचा प्रवाह सुरळीत झाला असून दुर्गंधी, अस्वच्छता तसेच पाणी साचण्याच्या समस्येतून परिसरातील नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

नागरिकांकडून तक्रारी प्राप्त होताच संबंधित विभागाशी समन्वय साधून ही कार्यवाही करण्यात आली. प्रभागातील ड्रेनेज, स्वच्छता, पाणीपुरवठा आणि रस्ते यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर तत्परतेने उपाययोजना करण्यावर भर देण्यात येत असल्याचे डॉ. घोडेकर-लोंढे यांनी सांगितले.



> “नागरिकांच्या आरोग्याशी आणि दैनंदिन जीवनाशी संबंधित समस्या प्राधान्याने सोडविणे ही आमची जबाबदारी आहे. यशवंतनगरातील ड्रेनेज तुंबल्याची तक्रार मिळताच तातडीने जेटिंग मशीनद्वारे साफसफाई करण्यात आली. प्रभागातील प्रत्येक नागरिकाला स्वच्छ, सुरक्षित आणि सुविधायुक्त परिसर मिळावा, यासाठी सातत्याने कार्यरत राहू.”
>
> **- डॉ. वैशाली घोडेकर-लोंढे,** मा. महापौर तथा नगरसेविका, प्रभाग क्रमांक ९ .




# किवळेत विद्यार्थ्यांनी साकारल्या पर्यावरणपूरक गणेशमूर्ती

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्याबाबत जनजागृती करण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम आणि उपआयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांच्या मार्गदर्शनाखाली ‘स्वच्छ सर्वेक्षण २०२६’ आणि ‘माझी वसुंधरा ७.०’ अंतर्गत हा उपक्रम राबविण्यात आला. किवळे येथील श्रीबापदेव महाराज शाळेत आरोग्य विभागाकडून विद्यार्थ्यांसाठी नैसर्गिक गणेशमूर्ती निर्मितीचा उपक्रम घेण्यात आला.

यावेळी विद्यार्थ्यांनी शाडू माती आणि नैसर्गिक साहित्याचा वापर करून गणेशमूर्ती तयार केल्या. गणेशोत्सवात पर्यावरणाची हानी टाळण्यासाठी मूर्ती तसेच सजावटीसाठी पर्यावरणपूरक पर्यायांचा वापर करण्याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. सजावटीसाठी कागद, कापड, बांबू, पाने आणि नैसर्गिक फुलांचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच थर्माकोल आणि एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकचा वापर टाळण्याबाबत जनजागृती करण्यात आली.

विद्यार्थ्यांच्या सहभागातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश देतानाच पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी प्रत्येकाने स्वीकारावी असे आवाहन महापालिका प्रशासनाकडून यावेळी करण्यात आले.

# भोसरीतील ‘डॉ. काटे डेंटल केअर’चे अत्याधुनिक रूपात नूतनीकरण

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**इंद्रायणीनगर येथील मिनी मार्केटमधील बहुचर्चित ‘डॉ. काटे डेंटल केअर अँड इंप्लांट सेंटर’ आणि लहान मुलांसाठीच्या ‘लिटल स्माईल्स’ या बालदंतचिकित्सा विभागाचे नूतनीकरण करण्यात आले असून, अत्याधुनिक सुविधांसह नव्या रूपात हा दवाखाना रुग्णांच्या सेवेत दाखल झाला आहे.**



रविवार, ६ सप्टेंबर रोजी विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या हस्ते या नूतनीकृत दवाखान्याचा उद्घाटन समारंभ उत्साहात पार पडला.

२००८ सालापासून रुग्णांच्या सेवेत असलेल्या या दंतचिकित्सा केंद्राचे उद्घाटन मा. उपमहापौर परशुरामजी वाडेकर व नगरसेवक डॉ. सुहास कांबळे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या सोहळ्याला महापौर रवी लांडगे, नगरसेवक निखिल बोऱ्हाडे, नगरसेविका अश्विनी वाबळे, नगरसेवक तुषार सहाणे माजी उपमहापौर शरद बोऱ्हाडे त्रिरत्न बौद्ध महासंघाचे धम्माचारी, डॉक्टर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### उपलब्ध प्रगत वैद्यकीय सुविधा

- डिजिटल दंतचिकित्सा: अचूक निदानासाठी अत्यंत प्रगत तंत्रज्ञानयुक्त ‘Carestream CBCT’ आणि ‘OPG’ मशीनची सुविधा.
- विशेष विभाग: गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियांसाठी अत्याधुनिक इंप्लांट व सर्जिकल विभाग.

‘लिटल स्माईल्स’ बालदंतचिकित्सा: बालदंततज्ज्ञ डॉ. प्रांजली काटे यांच्या मार्गदर्शनाखाली लहान मुलांच्या दातांच्या समस्यांवर अत्यंत सुरक्षित व भीतीमुक्त वातावरणात विशेष उपचार.

एकाच छताखाली आधुनिक, जागतिक दर्जाचे आणि सुरक्षित दंतोपचार सर्वसामान्यांना उपलब्ध करून देणे हाच आमचा मुख्य उद्देश असल्याचे संचालक डॉ. किर्तीराज दिलीप काटे आणि डॉ. प्रांजली काटे यांनी यावेळी सांगितले.